# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/02/2023 (मंगळवार) दुपार

## चोरी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा तांडा येथे दिनांक १९/०२/२०२३ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ग. भा. भाग्यशाला हनुधोज डोरले, वय ३७ वर्ष, रा. तांडा ता. मौदा जि. नागपुर हे गावातील शिवाजी महाराजांच्या कार्यक्रमा करीता गेले असता घरी परत आल्यावर त्यांच्या घराच्या दाराचा कुलुप तुटलेला दिसला घरात जावुन पाहीले असता घरातील सामान अस्तव्यस्त दिसले परंतु काही चोरीला गेल्याचे दिसले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जाधव ब. नं. १३३१ मो. नं ८८८८८२१३७६ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा निमतलाई येथे दिनांक २०/०२/२०२३ चे ११.०० वा सुमारास फिर्यादी जखमी नामे– विजय देवेंन्द्र यादव, वय २६ वर्ष, रा. निमतलाई ता. सावनेर व आरोपी नामे– मनिष देवेंन्द्र यादव, वय २९ वर्ष, रा. निमतलाई ता सावनेर जि. नागपूर हे सख्खे भाऊ असून वर नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा फिर्यादीचे आईला मोबाईल मागीत असतांना तिने मोबाईल नंतर देतो यावरून आरोपी हा आई सोबत भांडण करीत असतांना फिर्यादी याने आरोपीस हटकले असता आरोपीने विटेने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक विजय बारई पोस्टे खापा मो. नं. ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर :—** दिनांक २०/०२/२०२३ चे १२.३० वा. ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी पीडिता वय १५ वर्ष हि आपले मैत्रीणीस फेटरी गोडावुन बस स्टॉप वरून माहुरझरीकडे पायदळ जात असता यातील आरोपी नामे— समीर जहिर अहमद, वय ३८ वर्ष, रा. टेकानाका नागपूर हा त्याचे मोटार सायकल घेवून तिथे आला व यातील पिडीत मुलीला मोटार सायकल वर बसवून घेवून जात असता पिडीता हिला म्हटले की आपकी आखे बहोत प्यारी है। व पुढे जावून आपले मोटार सायकलचे साईड मिररमध्ये पाहुन पिडीताला डोळा मारला असे पिडीत हिच्या अज्ञात पणाचा व अल्पवयाचा फायदा घेवून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भा.द.वि. सहकलम ८, १२ पोक्सो २०१२ कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक रासकर पो.स्टे. सावनेर मो. नं. ९०८२१९६०८० या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**